महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्‌या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

# लेखन : स्व-अभिव्यक्ती

**अनुभव लेखन**

१) तू पावसात भिजून आल्यावर तुला कसे वाटले ते थोडक्यात लिही.
२) तुझा वर्ग स्वच्छ रहावा म्हणून तू काही प्रयत्न केले आहेत का? काय केले ते सविस्तर लिही.
३) घरातल्यांनी सांगितलेली कोणकोणती कामे करायला तुला आवडतं ते लिही. घरातल्यांनी सांगितलेली कोणती कामे तुला मनापासून करावीशी वाटतात ? का? ते लिही.
४) सकाळी चिंगी घराबाहेर आली .रात्री पाऊस पडून गेला होता. दारात मोत्याच्या पावलाचे ठसे उठले होते. तू तसे कोणकोणते ठसे पहिले आहेत ते लिही.
५) तुला सायकल चालवायला आवडते का?आवडत असेल तर काआवडते ते लिही. जर तुला आवडत नसेल तर का आवडत नाही ते लिही.
६) बाजारात गेल्यावर कोणकोणती दुकाने दिसतात?
७) नुकतेच जन्मलेले गाईचे वासरू कसे उभे राहते ते लिही.
८) लहान मुलाला बोलता येत नसतं. मग ते भूक लागली, खूप आनंद झालात्याला काही पाहिजे असेल तर ते कसं सांगते? तुझा अनुभव लिही .
९) तुला कार्टून्समध्ये सर्वात जास्त कोण आवडतो ? का आवडतो ते लिही.
१०) तुझ्या स्वतःबद्दल पाच वाक्यांत माहिती लिही.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

**कल्पनेवर आधारित लेखन**

१) मामाने तुला नवीन वही दिली. त्या वहीचा उपयोग तू कशासाठी करशील?
२) पाण्यातील माशाला तीन प्रश्न विचार.
३) तुला मांजरीचे पिलू सापडले तर तू काय करशील?
४) चंद्राचं घर कसं असेल असं तुला वाटतं ?तुझ्या कल्पनेतल्या चंद्राच्या घराचं वर्णन कर
५) तुला आभाळ भेटायला आलं तर तू त्याला काय काय विचारशील?
६) शिडीवरून मामा कौलांवर चढला आहे. तो आता काय करणार असेल? दोन ते तीन वाक्यांत लिही.
७) इंद्रधनुष्याला पाहून तुला कोणकोणते प्रश्न पडतात? कोणतेही तीन प्रश्न लिही.

**चित्र काढून वर्णन**

१) शाळेसमोरच्या झाडाच्या पानाचे चित्र काढ. ते कसं दिसतं ,त्याचा आकार कसा आहे यावर दोन वाक्यात लिही.
२) तुला आवडेल ते चित्र काढ. त्याचे वर्णन लिही.

**पत्रलेखन**

मित्राला मैत्रिणीला आजारातून लवकर बरं व्हावं म्हणून शुभेच्छा देणारी छोटीशी चिट्ठी लिही

**भाषिक खेळ**

कालवा _वास _

शेवटच्या अक्षराने सुरु होणारा शब्द लिहून शब्दांची अंताक्षरी पूर्ण कर (चार-पाच शब्द अपेक्षित)

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

**माहितीपर लेखन**

१) तू दोरीवरच्या उड्या मारल्या असतीलच .दोरीचा खेळायला जसा उपयोग होतो तसे दोरीचे आपण काय-काय उपयोग करतो ?

**शब्दांवरून गोष्ट**

खालील शब्दावरून गोष्ट तयार कर.

१) रेडकू म्हैस, हरवणं , शोध.....

२) थंडी, शेकोटी, ऊब, पहाट

३) कोंबडी, पिली, डालगे

४) भाऊ, बहिण, फुलपाखरू